# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**<u>प्रसिद्धी पत्रक                                    ता. २६ नोव्हेंबर २०१९</u>**

# क्रीडा धोरण आखण्यासाठी सूचना आमंत्रित

## समितीच्या बैठकीत माहिती : लवकरच ठरणार धोरण

**नागपूर, ता. २६ :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने लवकरण क्रीडा धोरण आखण्यात येत असून यामध्ये क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ आणि ज्येष्ठ प्रशिक्षकांकडून सूचना आमंत्रित करण्यात आल्या आहेत. महापौरांच्या वतीने यासाठी गठीत क्रीडा धोरण समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात मंगळवारी (ता. २६) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला समितीचे अध्यक्ष तथा क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले, माजी सभापती नागेश सहारे, नगरसेवक प्रमोद तभाने, विजय

चुटेले, दीपक वाडीभस्मे, उपायुक्त राजेश मोहिते, क्रीडा अधिकारी पियुष आंबुलकर, ज्येष्ठ श्रेणी लिपिक जितेंद्र गायकवाड उपस्थित होते.

बैठकीत सर्वप्रथम प्राथमिक विषयांवर चर्चा करण्यात आली. क्रीडा धोरण तयार करण्यात येत असून ते सामान्य खेळाडूंच्या हिताचे असावे, खेळ आणि खेळाडू यांच्या विकासाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने क्रीडा धोरणाचे स्वरूप असावे, असे निश्चित करून चर्चा करण्यात आली. नागपुरातील क्रीडा संघटना, ज्येष्ठ खेळाडू, प्रशिक्षक यांच्याकडून यासंदर्भात लेखी सूचना ३० नोव्हेंबरपर्यंत मागविण्याचे निर्देश समितीचे अध्यक्ष प्रमोद चिखले यांनी दिले.

सदर बैठकीत क्रीडा नियंत्रण अधिकारी नितीन भोळे, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी, माजी क्रीडा अधिकारी नरेश सवाईथूल आदी उपस्थित होते.